# उदयोजकता

सुंदरा मनामध्ये भरलीच्या पहिल्या भारत दौऱ्यापासून शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची व माझी घनिष्ट जानपेहचान झाली. आता ते दरवर्षी जेव्हा अमेरिकेला येतात तेव्हा आम्ही भेटतोच. ते तरी माझ्याकडे येतात किंवा मी ते जेथे उतरले असतील तिथे त्यांना जाऊन भेटते. भारतात जसे मोठ्या मैदानावर ''जाणता राजाचे'' होतात तसे प्रयोग अमेरिकेत करायचे हे त्यांचे स्वप्न आहे.मी अमेरिकेत सातत्याने नाटक करत असल्यामुळे ते स्वप्न साकार होण्यासारखे आहे का ? हे जाणण्यासाठी ते मला कित्येक दिवसापसून जाणता राजाचा प्रयोग बघायला सांगत होते पण ते काही केल्या होत नव्हते. 'जाणता राजाचे' प्रयोग माझ्या भारत भेटीच्या आधी तरी व्हायचे किंवा मी परत अमेरिकेला निघून गेल्यावर. त्यामुळे गेल्या जानेवारीत काही करुन प्रयोग बघायचाच असे मी ठरवले. त्यावेळी महाराष्ट्रात प्रयोग नव्हते. अेकाच जागी प्रयोग चालले होते. पार गुजराथमध्ये नवसारीला. पण नाटक पहायचेच असल्यामुळे अेका मैत्रीणीला घेऊन नवसारीला जायचे अस्मादिकानी ठरवले. सगळेच आयत्या वेळी ठरल्यामुळे नवसारीला जायला सुरतपासूनचे तिकीट मिळत होते. त्यामुळे आधी गाडीने सुरत व नंतर टॅक्सीने सुरतहून नवसारीला जायचे असा बेत ठरला. सुरतसारख्या ठिकाणी पहिल्यांदा जाणार अर्थात थोडे शॉपिंग करणे भाग होते, म्हणून पहाटेची गाडी पकडली. शॉपिंगमध्ये व्यत्यय नको म्हणून सुरतला पोचल्यापोचल्या अेका जागी अप्रतिम गरमागरम भोजन केले व 'सुरतनु जमण अने काशीनु मरण' असे का म्हणतात याचा बोध झाला. सुरतेत यथासांग खरेदी झाल्यावर टॅक्सी पकडून नवसारीकडे कूच केले. जाताना गावाबाहेर अेक बांधणीचे दुकान दिसले. आतापर्यंतच्या खरेदीत बांधणी साडी घेतली गेली नव्हती याची जाण होऊन लागलीच टॅक्सी थांबवून आत जाणे झाले व आम्हाला केवळ दहा मिनीटे असल्याचे दुकानदाराला सांगितले. दुकानदार गुजराथी होता, त्यामुळे समोरची गिऱ्हाईके शॉपिंगभोक्ती असल्याचे त्याला तत्काळ कळले. त्याने दुकानातलातमान स्टाफ आणून ''अश्या साड्या मुंबईला बघायलादेखील मिळणार नाहीत'' असे सांगत आमच्यापुढे अेकामागोमाग अगणित साड्या उलगडल्या. दृष्टीभ्रम झाल्यासारखे होऊन आम्ही त्यातल्या दोन साड्या उचलल्या. साड्या बॉक्समध्ये बांधताबांधता त्याने

साडीला मॅचींग ब्लाऊज मागच्याच गल्लीत मिळतो असे तत्परतेने सांगितले. 'जाणता राजाला' अजून वेळ होता. अशी संधि दवडण्याजोगी नव्हती. अमेरिकेतल्या गुजराथी मैत्रीणींचे गुजराथहून आणलेले फॅशनेबल ब्लाऊज डोळ्यासमोर तरळले व लागलीच पावले मागच्या गल्लीकडे वळली. हातातले गिऱ्हाईक न सोडण्यासाठी दुकानदाराने आपला माणूस बरोबर दिला होता हे सांगणे नलगे.

सुरत नवसारी रस्त्यामागच्या छोट्या गल्लीतल्या अेका छोट्या शिंप्याच्या दुकानासमोर आम्ही पोचलो. तेव्हा प्रथम दर्शनावरुन इथे काही चांगले मिळेल अशी आशा नव्हती. आम्ही बाहेर पडायच्या तयारीत होतो पण तेवढ्यात आतून आशाबेन नामक दुकानदारीण पदार्पण करती झाली व सगळे पालटले. मला चांगल्यापैकी गुजराथी बोलता येते त्यामुळे मी तिच्याशी गुजराथीतच बोलत होते पण तिने पहिल्या नजरेतच ही अमेरिकेची NRI आहे हे जोखले व माझ्या गुजराथीकडे संपूर्ण दुर्लक्ष करत ती चक्क इंग्लीशमध्ये बोलायला लागली. मला काय पाहिजे हे तिने तोंडदेखील विचारले खरे पण त्याआधीच मला कसे पटवायचे हे तिने स्वत:च्या मनाशी ठरवले असणार. कारण मला पाय वर करायला सांगून मी बसलेल्या बाकाच्या खालच्या कप्प्यातून आधी तिने भराभर पाच सहा कॅटलॉग्ज काढले. इवल्याशा शिंप्याच्या दुकानात इतके कसले कॅटलॉग्ज हे माझ्या मनातले विचार जणू ओळखत तिने आम्हाला माहिती पुरवायला सुरवात केली. ''दरवर्षी मी याच गावातली बऱ्यापैकी दिसणारी मुलगी हुडकून तिला मॉडेल बनवते. मुलगी अेकच असते पण केसांच्या वेगवेगळ्या फॅशन करुन, तिला वेगवेगळा मेकप करुन पाच वेगळ्या मुली आहेत असा आभास निर्माण करते. मग मी डिझाईन केलेले ब्लाऊज तिच्या मापात शिवून घेते व ते ब्लाऊज तिला घालायला लावून, अेक स्थानिक फोटोग्राफर आणून, ब्लाऊजच्या लेटेस्ट फॅशनचे कॅटलॉग्जची बनवते व लगेचच त्या कॅटलॉग्जची सीडी तयार करते. अमेरिकेतले NRI कस्टमर जेव्हा भारतात येतात तेव्हा त्यांच्याकडे वेळ अगदी कमी असतो. त्यांचा वेळ वाचवण्यासाठी मी त्यांना सीडी घरी बघायला देते. सीडीवर स्वत:चे माप कसे घ्यायचे ह्याच्या सूचना पण आहेत. कस्टमर ब्लाऊझचा पॅटर्न सिलेक्ट करतात. पॅटर्नचा नंबर देतात, त्याबरहुकूम मी त्यांना दोन तीन दिवसात ब्लाऊझ तयार करुन देते. माझ्या ब्लाऊझपॅटर्नच्या सीडी आता अमेरिकेत भरपूर खपतात त्यामुळे अमेरिकेतले कस्टमर्सदेखील खूप वाढले आहेत. कधीकधी तर मला ई – मेलवरुन ऑर्डर्स येतात व पार्सलने ब्लाऊझपीस. गिऱ्हाईकाला न बघता मी सर्रास अमेरिकेत ब्लाऊझ शिवून पाठवत असते.''

तिची माहिती देणे संपले तेव्हा आमचे डोळे आश्चर्याने विस्फारले गेले होते व

माझ्या हातात एक सीडी पडली होती. आशाबेनला, ती नवसारीजवळच्या छोट्या गावात आहे वा तिचे दुकान मागच्या गल्लीत आहे किंवा खूप छोटे आहे याची जराही खंत नव्हती. तिने कशाबद्दलही तक्रार केली नव्हती. तिच्यातला कल्पक, हुशार, धीट उद्योजक केवळ गिऱ्हाईकाची सोय हे ध्येय डोळ्यापुढे ठेवून मॉडर्न टेक्नॉलॉजीचा उपयोग करत परिस्थितीवर मात करत पार अमेरिकेपर्यंत जाऊन पोचला होता.

'जाणता राजा' अमेरिकेला जेव्हा होईल तेव्हा होईल पण आशाबेनच्या एका NRI कस्टमरमध्ये मात्र भर पडली आहे.

डॉ. मीना नेरुरकर

nerurkarmeena@yahoo.com

****************

(भिसे, कारखानीस कुटुंबीय आणि "मायबोलीचा विश्वसेतू" च्या सह-संपादकांच्या परवानगीने "मायबोलीचा विश्वसेतू" या पुस्तकातून)